Vol 4 Issue 5 Feb 2015

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 5 | Feb. 2015
Available online at www.ror.isrj.org

# *गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे यांचे राष्ट्रीय जागृतीप्रती योगदान*

*निलीमा डि. राउत (कोहळे)*

इतिहास विभागप्रमुख डॉ. पंजाबराव देशमुख कला वाणिज्य (सांयम्) महाविद्यालय, नागपूर.

***सारांश*** :– दादासाहेबांनी लोकमान्य टिळकांपासून प्रेरणा घेवून त्यांच्या चर्तुःसुत्रीचा म्हणजे स्वदेशी बहिष्कार राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्याच्या माध्यमातून भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय जागृती व समाजाचे संघटन घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य केले. दादासाहेबांनी ज्या राजकीय चळवळी चालविल्या ज्या अनेक संघटना स्थापन केल्या त्यामागची प्रेरणा शक्ती टिळकांची होती.

### ***प्रस्तावना :–***

दादासाहेब खापर्डे यांच्या कर्तृत्वाचा कालखंड म्हणजे भारतावरील ब्रिटीश राजसत्तेचा मध्यान्ह होय. ब्रिटीश राज्यकर्ते भारतावरील आपली आधीसत्ता स्थिर दृढमुल कशी होईल या विचाराने प्रेरित होवून आपला राज्यशकट त्या दिशेने हाकित होते. याच वेळी अव्वल ब्रिटीश राजवटीत ब्रिटीशांची अधिसत्ता नष्ट करून आपल्या भारतभूमीला पुनश्च स्वातंत्र्य रवीच्या मंगलकिरणाचें स्नान घालून तिच्यावरील पारतंत्र्याचा कलंक स्वच्छ धुवून काढण्याचा विडा उचलणारे देशभक्त निर्माण होत होते. असल्या मंडळीत क्रांतीकारक, राजकारणी, जहाल, मवाळ, लेखक, संशोधक आणि वक्ते सुध्दा होते. आपल्या स्वभावाप्रमाणे ज्याला जो मार्ग रूचला, पटला व झेपला तो मार्ग त्यांने स्विकारला, चोखाळला आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यक्रमात आपला वाटा उचलला. श्री दादासाहेब याच प्रभावळीतले होते. लोकमान्य टिळकांना सर्वच क्षेत्रात आदर्श मानून त्यांचे सर्वतोपरी अनुसरण व अनुयायीत्व करणा–या दादासाहेबांचे कार्य कदापीही दृष्टीआड करता येणार नाही.

श्री दादासाहेबांनी लोकमान्य टिळकांच्या चर्तुःसूत्रीचा प्रचार करीत असतांना पुणे प्रमाणे व–हाडमध्येही गणेशोत्सव व शिवाजी उत्सव सुरू केला. त्याचप्रमाणे राष्ट्रवादासाठी तरूणांची आवश्यकता असल्यामूळे तसेच ब्रिटीशांच्या अन्यायी धोरणाला प्रतिकार करण्यासाठी राष्ट्रीय शाळाची निर्मीती केली. स्वदेशी व बहिष्कार चळवळीच्या माध्यमातून राष्ट्रीय जागृती घडविण्याचा प्रयत्न केला.

### ***श्री दादासाहेब पुणे सार्वजनिक गणेशउत्सवाचे अध्यक्ष –***

लोकमान्य टिळकांनी घराघरात होणा–या गणपती व शिवाजी उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. गणेशोत्सवाला ज्ञान सत्राचे स्वरूप देण्याची कल्पना लोकमान्य टिळकांची होती1. विस्कळीत झालेल्या हिंदू समाजाला संगठीत करण्यासाठी जनतेला स्वाभीमानाचे देशभक्तीचे राष्ट्रीय चळवळ उभारणीत या उत्सवाचे अनन्यसाधारण महत्व आहे. अशा या उत्सवाला पुण्यांमध्ये इ. स. 1894 मध्ये लोकमान्य टिळकांच्या आग्रहावरून श्री दादासाहेब खापर्डेंना गणेशउत्सवाचे अध्यक्षस्थान भुषवावे लागले होत2.
या ठिकाणी दादासाहेबांनी सामाजिक संघटन व राष्ट्र उभारणीसाठी गणेशोत्सवाचे महत्व, ब्रिटीश सत्ता झुगारून देण्यासाठी एक प्रचंड ताकद निर्माण करणे हा या उत्सवातील उद्देश या विषयावर लोकांना मार्गदर्शन केले. कीर्तन, पोवाडे, मेळे, गायन, भजन, प्रवचन असे या उत्सवाचे स्वरूप होते.

श्री दादासाहेब खापर्डे पुढे सार्वजनिक उत्सवाबरोबरच नाशिक, धुळे इत्यादी गावातील उत्सवांमध्ये सुध्दा सहभागी होवून विदर्भाच्या परिसरात या उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय चळवळ उभारण्याचे कार्य करीत होते. यवतमाळला डॉ. परांजपे यांनी लोकमान्य टिळक व दादासाहेब खापर्डे यांना गणेश उत्सवासाठी आमंत्रीत केले होते.3

### ***अमरावती शहरातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव :–***

अमरावती शहरात खाजगी रीतीने काही सधन लोक आपल्या दिवाणखान्यात गणपती बसवून तर काही लोकाकडे

परंपरागत असा उत्सव व्यक्तीशः साजरा केला जाई. या शहरात चालणा—या गणपती उत्सवाला राष्ट्रीय जागृतीसाठी समाजाचे संघटन करण्यासाठी पुणे परिसरात अभ्यासल्याप्रमाणे अमरावती शहरात या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप आणण्यासाठी यशस्वी प्रयोगाला सुरूवात केली.

इ. स. 1900 मध्ये पहिला सार्वजनिक गणेशोत्सव श्री दादासाहेब खापर्डे यांच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांनी साजरा केला. हा उत्सव इंद्रभुवन थिएटर मध्ये साजरा झाला4. त्यावेळी पोवाडे, गायन, मेळे, व व्याख्याने इत्यादी कार्यक्रम झाले. लोकांनी या उत्सवात मोठया संख्येने भाग घेतला. दादासाहेब जोशी (मोरोपंताचे वडील) यांनी या उत्सवात प्रामुख्याने भाग घेवून उत्सवाला ख—या अर्थाने सार्वजनिक स्वरूप आणले होते.5

### *अमरावती शहरातील शिवाजी उत्सव :—*

शिवाजी उत्सवासारखी राष्ट्रीय शिक्षणाचे उत्कृष्ट साधने लोकमान्य टिळकांनी निर्माण केली होती. त्याला व—हाडात उत्तम प्रतिसाद देण्यासाठी दादासाहेब खापर्डेचे प्रयत्न निःसंशय प्रयत्नशिल होते.6 सार्वजनिक शिवाजी उत्सवाचे लोण संपूर्ण विदर्भभर पसरायला सुरूवात झाली. अकोल्याला दादासाहेब खापर्डेच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक उत्सवाला प्रारंभ झाला. नागपूरातील शिवाजी उत्सवाची मुहुर्तमेढ दादासाहेबांनी रोवली. दादासाहेबांच्या प्रयत्नांने यवतमाळ, वणी, मेहकर इत्यांदी गावांमध्ये सार्वजनिक उत्सव सुरू झाले.

अमरावतीला श्री दादासाहेबांच्या प्रेरणेने शिवाजी उत्सवाचे आयोजन होत असे. इ.स. 1902 ला श्री दादासाहेबांच्या अध्यक्षतेखाली साजरा झालेल्या शिवाजी उत्सवामध्ये त्यांचे चिरंजीव बाबासाहेब खापर्डे, शामराव देशपांडे यांनी पोवाडा म्हटला होता.7

I Sent my son to Indexabhuwan theatre for Shivaji Jayanti. There was a very large Audience. Sakharanpant and Patankar company made very good arrangement. 8

1905 अमरावती शहरात झालेल्या शिवाजी उत्सवाला लोकमान्य टिळक उपस्थित होते. कुभांरवाडयातील दत्त मंदिरात हा उत्सव पार पडला. या उत्सवाच्या माध्यमातून नाटक, पोवाडे, मोठमोठया कलाकारांना बिदागी मिळू लागल्या.9 अशा धार्मिक उत्सवानिमीत्त होणारी भाषणे कीर्तने किंवा गीतांद्वारा जनतेमध्ये राजकीय विचार व कर्तव्यविषय जाणीव जागृती निर्माण होत असे. अमरावतीच्या धर्तीवरच यवतमाळला सुध्दा शिवाजी उत्सवाने जोर धरला होता10.

कलकत्ता शिवाजी उत्सव — 1906 मध्ये कलकत्याला लोकमान्य टिळक, दादासाहेब खापर्डे व इतर मंडळी शिवाजी उत्सवासाठी उपस्थित होते.11

### *स्वदेशी बहिष्कार चळवळीचे माध्यमातून राष्ट्रीय जागृती —*

श्री दादासाहेब खापर्डेनी अमरावती व नागपूर येथे ऑगस्ट 1905 रोजी सभा घेवून स्वदेशी चळवळीत लोकांनी विशेषतः विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. याचा परिणाम म्हणून अमरावती व संपूर्ण विदर्भात स्वदेशीचा पुरस्कार झाला. स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळीने जनतेच्या हृदयावर प्रभाव पाडणे सुरू झाले. अमरावती, नागपूर तसेच संपूर्ण विदर्भात स्वदेशी व बहिष्काराची चळवळ राबविली जात होती. गावांगावामध्ये सभा घेवून राजकीय व शैक्षणिक विषयाबरोबरच स्वातंत्र्याविषयी प्रेम जागृती निर्माण करण्याचे कार्य या माध्यमातून चालत असे. बुलढाणा जिल्हयातील मेहेकर येथे स्वदेशी आंदोलनाची मुहुर्तमेढ रोवल्या गेली.

अमरावती येथे वासुदेवराव खोत यांनी स्वदेशीचे दुकान काढले.12 इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्या मित्रांसोबत अमरावती येथे स्वदेशी कल्याणाचे उद्योग सुरू केले.13 स्वदेशीच्या प्रचारासाठी पैसा, फंड, जमा करायला सुरूवात केली. तसेच कापड, मिठ, साखर, आगपेटया या चार वस्तु ब्रिटीश कारखान्याच्या वापरायच्या नाहीत. असा गावोगावी प्रचारसुध्दा केला.यवतमाळ जिल्हयांमध्ये देशभक्ताच्या मनात व नव्या पिढीत नवचैतन्य पसरविण्याचे काम दादासाहेबांनी निर्माण केले होते.14

### *नागपूर स्वदेशी चळवळ —*

बंगाल प्रांतामध्ये बनारस कॉग्रेसनंतर स्वदेशीची चळवळ मोठया प्रमाणांत फोफावली. या चळवळीचे अग्रदुत अश्विनीकुमार दत्त होते. नागपूरात मात्र ही चळवळ विद्यार्थ्यानी हाती घेतली. नागपूरच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रकार्याची जाणीव म्हणून स्वतःला स्वदेशी आंदोलनात झोकून दिले. लोकमान्य टिळक, श्री दादासाहेब खापर्डे व डॉ. मुंजे यांच्या सतत संपर्कामूळे व मार्गदर्शनामुळे नागपूरचा विद्यार्थी वर्ग अतिशय जागृत झाला होता. त्या काळात विद्यार्थ्यामध्ये जयकृष्णपंत उपाध्य, भाऊसाहेब दुराणी, भवानीशंकर नियोगी, श्रौती, पांढरी पांडे, पंढरपूरकर हे विद्यार्थी होय. या सर्व विद्यार्थ्यांचे नेतृत्व जयकृष्ण पंतानी केले होते.

नागपूरमध्ये विद्यार्थ्याबरोबरच काही क्रांतीकारक सुध्दा या स्वदेशी आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. यामध्ये रामलाल वाजपेयी, डॉ. खानखोजे, सिध्दनाथ काणे हे होते. यावेळी या आंदोलनाच्या दरम्यान विद्यार्थ्यांद्वारे जवळपास 34 संस्था नागपूरमध्ये चालत होत्या. या सर्वासाठी लोकमान्य टिळकांची प्रेरणा, शिवाजी उत्सव, गणेश उत्सवाच्या माध्यमातून होत होती.

नागपूरात स्वदेशी आंदोलनाला मजबूती आणण्यासाठी तेथील वृत्तपत्रांनीही मोलाची कामगिरी बजावली. नागपूर येथून प्रकाशित होणारे 'देशसेवक' या वृत्तपत्रांने सर्वत्र महत्वाची कामगीरी बजावली होती.15 या वृत्तपत्रातून जहाल विचारांनी ओतप्रोत लेख संग्रह प्रकाशीत होत होते. वृत्तपत्राच्या माध्यमातून मवाळ वृत्तीच्या व्यक्तीचेही हृदय परीवर्तन होत असे व त्यांच्या मनामध्ये

ब्रिटीश शासनाच्या अत्याचाराविरूध्द चिड निर्माण होत असे. मराठी व हिंदी या भाषेमधून या स्वदेशी चळवळीच्या विचाराचा प्रचार व प्रसार झाला होता. नागपूरात या दोन वृत्तपत्राचा वाटा मोलाचा होता. इंग्रजाच्या टिकेला बळी पडणा–यांना तसेच स्वातंत्र्य प्रेमाच्या निर्मीतीसाठी हे वृत्तपत्र वाघिणीचे दुध ठरले.

*यवतमाळ स्वदेषी चळवळ –*

यवतमाळ मध्ये स्वदेशी चळवळ मोठया प्रमाणात प्रचलीत झाली होती. यवतमाळ जिल्हयांमध्ये देशभक्तांच्या मनात व नव्या पिढीत नवचैतन्य पसरविण्याचे काम दादासाहेबांनी निर्माण केले होते.16 पृथ्वीगीर गोसावी यांनी हरिकिशोर असे सूचक नाव देवून वर्तमानपत्र सुरू केले.. या वर्तमानपत्रातून टिळकांच्या चर्तु:सुत्रीचा पुरेपूर पुरस्कार केल्या जात होता. गणपतराव दौडे यांनी स्वदेशीचे दुकान काढून स्वदेशीचा सक्रिय प्रचार चालविला होता.17

*शैक्षणिक कार्यातून राश्ट्रीय जागृती –*

व–हाडातील शैक्षणिक चळवळ चिरडून टाकण्याचा ब्रिटीशांनी घात घातला होता. परंतू विदर्भातील नेते मात्र इंग्रजासमोर डगमगले नाहीत तर त्यांनी मोठया जोमाने शैक्षणिक कार्य सुरूच ठेवले. व विदर्भाला शैक्षणिक कार्याची जोड दिली.

*राष्ट्रीय शाळेची निर्मिती –*

सरकारी हायस्कुलच्या बोर्डींगमधील विद्यार्थ्यी राजकीय सभांना उपस्थित राहू लागले. या कारणास्तव इंग्रज अधिकारी विद्यार्थ्याना हायस्कूलमधून काढून टाकत होते हया विद्यार्थ्यांनी दादासाहेब खापर्डे यांच्याकडे आपली व्यथा व्यक्त केली. ब्रिटीश शिक्षणाधिका–यांची ही अरेरावी भविष्यातही असे घडण्याची शक्यता असल्याचे जाणून बेरार एज्युकेशन सोसायटी नावांची संस्था काढण्यांत आली.19 या संस्थेमार्फत सुरु करण्यांत यावयाच्या हायस्कुलला इमारत बांधण्यासाठी कारंज्याचे श्रीमंत कान्नव यांनी 20 हजाराची देणगी संस्थेला दिली होती. या कार्यासाठी अमरावतीचे नेते रा. ब. मुधोळकर, सर मोरोपंत जोशी यांनीही सहकार्य दिले. दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या सहका–यांसह व–हाडभर दौरा काढून पैसा जमविला. सरकारी बोर्डीगमधून काढलेल्या विद्यार्थ्यामुळे एक राष्ट्रीय प्रयोगशाळा अस्तित्वात आली. या हायस्कुलमध्ये मुलांच्या शारीरीक नैतिक राष्ट्रीय तसेच देशप्रेम आणि देशभक्ती शिकवण्याचाही निष्ठापूर्वक प्रयत्न करण्यांत येत होता. या शाळांना वीर वामनराव जोशी, बापूजी अणे यासारखे देशभक्त शिक्षक लाभले.20

*यवतमाळची राष्ट्रीय शाळा –*

बाबासाहेब परांजपे व लोकनायक अणेच्या पुढारीपणामुळे स्वदेशी व बहिष्कार चळवळ खेडयापाडयातील व्यक्तीपर्यंत जावून पोहोचली. आणि राष्ट्रीय शिक्षणांची यवतमाळची शाळा राष्ट्रीय तत्वज्ञानाचा प्रचार करणारी ठरली. यवतमाळला सरकारी शाळांच्या विरोधात राष्ट्रीय शाळा श्री माळवी यांच्या विठ्ठल मंदिराच्या आवारात स्थापना केली. सरकारी शाळा सोडून विद्यार्थी या शाळेत भरती झाले. राष्ट्रीय शाळा, व्यायाम शाळा, वसतीगृह मुष्ठीफंड इत्यादी कार्यक्रम त्यावेळी चालत असत. पुढे विद्यागृह ही राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन करून तिच्या मार्फत दासनवमी पासून शिवजयंतीपर्यंत नानाप्रकारचे राष्ट्रीय उत्सव करून टिळक व खापर्डे यांच्या कार्याला गती प्राप्त करून दिली.

*संदर्भ –*


1. यशवंत दिनकर फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड–1, श्री विद्या प्रकाशन पुणे, 1989, पृ. 95
2. बा. ग. खापर्डे, श्री दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र., प्रसाद प्रकाशन पुणे, 1962, पृ. 78
3. स. ह. बल्लाळ, तपस्वी परांजपे चरित्र, तपस्वी परांजपे चरित्र मंडळ प्रकाशन यवतमाळ, 1947, पृ. 52
4. भि. दे. कारंजकर., अमरावती शहराचा इतिहास., नगर पालीका प्रकाशन अमरावती.,1978,
5. कित्ता पृ. 53
6. शांताराम कडवे, माधव सरपटवार (संपा.) ओंजळ, लोकनायक बापुजी अणे गौरव ग्रंथ 1981, पृ.. 68
7. बा. ग. खापर्डे माधव सरपटवार (संपा.) ओंजळ, लोकनायक बापुजी अणे गौरव ग्रंथ 1981, पृ. 214
8. कित्ता पृ.. 215
9. कित्ता पृ. 216
10. नारायण नागोराव हुड., विदर्भ संशोधनाचा इतिहास, आनंद प्रकाशन यवतमाळ., 1953, पृ.311. कित्ता पृ. 4
12. नि. आ. वक्कानी, आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003, पृ. 74
13. भि. दे. कारंजकर आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003, पृ. 30
14. कित्ता पृ. 79
15. नि. आ. वक्कानी आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003, पृ. 33

16. कित्ता पृ. क. 79
17. शांताराम कडवे आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003, पृ. 185
18. बा. ग. खापर्डे आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 2003, पृ. 313
19. किशोर दीघेकर, अमरावती जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, आगॅस्ट कांती सुवर्ण महोत्सव समिती मुबंई 1992, पृ. 6
20. स. ह. बल्लाळ., लोकनायक बापुजी अणे जिवन चरित्र., राजस्थान प्रिंटीग ॲन्ड लिथो वर्क्स प्रकाशन अकोला 1932, पृ.19

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org